दिनांक- ३०/०४/२०२५

- : प्रेस नोट :-

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
गुन्हा नोंद क्र. २४/२०१७, कलम- ७, १३(१)(ड) सह १३(२) भ्र.प्र.अधिनियम १९८८
विशेष खटला क्र. ३४/२०१८

आरोपी - १) श्री. प्रविण केशव सिंह, विभाग निरीक्षक, जी/दक्षिण विभाग, मनपा, मुंबई
यांनी लाच स्विकारल्या प्रकरणी ४ वर्षे कारावास व रू. ५५,०००/- द्रव्यदंडाची शिक्षा

यातील आरोपी लोकसेवक यांनी लोकसेवक पदाच्या नात्याने काम करतांना फिर्यादी यांचे कंपनीचे होर्डिंग लावण्यासाठी '' नो डयुज'' प्रमाणपत्र देण्याकरीता तक्रारदार यांचेकडून रू. ४,००,०००/- लाचेची मागणी करून त्यातील रू. २,००,०००/- पुर्वीच स्विकारले होते. परंतू तक्रारदार यांना लोकसेकास उर्वरीत लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाप्रवि, मुंबई कार्यालयात तक्रार केली. त्यानुसार करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी कायदेशीर परिश्रमाखेरीज पारितोषन म्हणून उर्वरीत लाचेची रक्कम रू. २,००,०००/- मागणी करून स्विकारले म्हणून ला.प्र.वि., मुंबई विभागाकडुन गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करून मा. विशेष सत्र न्यायालयात उपरोक्त नमूद आरोपी यांचेविरूध्द विशेष खटला क्र. ३४/२०१८ अन्वये दोषारोप पत्र सादर करण्यात आले होते. सदर खटल्याची सुनावणी मा. विशेष सत्र न्यायालय, कोर्ट क्र. ४६ येथे झाली असता, सुनावणी अंती लोकसेवक आरोपी विरूध्द आरोप सबळ पुराव्यानिशी सिध्द झाल्याने दिनांक ३०/०४/२०२५ रोजी मा. न्यायालयाने नमुद आरोपीस प्रत्येकी ४ वर्षे कारावास व रू. ५५,०००/- द्रव्यदंड.

सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. सीमा अडनाईक, पोलीस निरीक्षक यांनी केला. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता श्री. रमेश सिरोया यांनी काम पाहिले.

सहाय्यक पोलीस आयुक्त
सत्यमेव जयते
बृहन्मुंबई
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

( मनिषा झेंडे)
सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री क्र.** १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :— acbmaharashtra.gov.in,
**ईमेल** :— acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :— addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :— www.facebook.com - Maharashtra ACB
**मोबाईल ॲप** :— www.acbmaharashtra.net